बीड । महाराष्ट्र
मंगळवार दि.१७ फेब्रुवारी २०२६
वर्ष ५ वे । अंक ३१७
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










## महावितरणाचा निष्काळजीपणा निष्पाप जीवावर बेतला

# विजेच्या धक्क्याने मुलाचा मृत्यु

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील गोरे वस्ती भागात असलेल्या एका उघड्या विद्युत रोहित्राला चिटकल्याने १५ वर्षीय मुलाचा जागीच मृत्यु झाल्याची घटना घडली. शेख आवेज शेख परवेज असं या मृत मुलाचं नाव असून, या घटनेमुळे संपूर्ण बीड शहरात शोककळा पसरली आहे आणि नागरिकांमधून महावितरणविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**

गोरे वस्ती परिसरात नेहमीप्रमाणे जनजीवन सुरू असताना शेख आवेज हा परिसरातून जात होता. याच भागात महावितरणची एक उघडी डीपी आहे, ज्याची दारे उघडी होती आणि तारा बाहेर लोंबकळत होत्या. या उघड्या डीपीला आवेजचा अचानक स्पर्श झाला आणि विजेचा जोरदार धक्का लागून तो तिथेच कोसळला. परिसरातील नागरिकांनी तात्काळ धाव घेत त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला आणि संबंधित विभागाला माहिती दिली. आवेजला तातडीने जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले.या घटनेनंतर गोरे वस्तीसह संपूर्ण शहरातील ▶▶ पान २ वर

### चौकशी करून कारवाई करणार–एस.पी.

आ. विजयसिंह पंडित यांनी पोलीस अधिक्षकांशी मोबाईलवरून चर्चा करून घटनेची माहिती दिली. या प्रकरणी लोकांच्या भावना त्यांच्या समोर मांडल्या. त्याची दखल घेत पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी या सर्व घटनेची चौकशी करून कारवाई करणार असल्याचे आश्वासन दिले.



### २० तासानंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला

उघड्या डीपीला चिटकल्याने शॉक बसून त्याचा मृत्यू झाल्याने याला महावितरणचा बेजबाबदारपणा कारणीभूत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला होता. मात्र आज सकाळपर्यंत महावितरणने या प्रकरणाची कसलीच दखल घेतली नव्हती. त्यामुळे शेवटी लोकप्रतिनिधींना आणि नागरीकांना रस्त्यावर उतरावे लागले, आंदोलन करावे लागेल. त्यानंतर पोलीस प्रशासनाने चौकशी करून कारवाईचे आश्वासन दिल्याने आज दुपारी १ वाजण्याच्या सुमारास मुलाचा मृतदेह नातेवाईकांनी ताब्यात घेतला.

### आ.विजयसिंह पंडित यांचा एसपींना फोन

भर उन्हात नागरीक रोडवर ठिय्या मांडून बसले होते. जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत उठणार नाहीत अशी आक्रमक भुमिका यावेळी आंदोलकांनी घेतली होती. अखेर आ.विजयसिंह पंडित यांनी पोलीस अधिक्षकांशी मोबाईलवरून चर्चा करत नंतर आंदोलकांशीही मोबाईलवरूनच संवाद साधून या प्रकरणात तातडीने कारवाई करू असे आश्वासन पोलीस अधिक्षकांनी दिल्याचे सांगितले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

## २ हजार ४०० विद्यार्थ्यांना मिळणार आरटीई अंतर्गत मोफत प्रवेश–जाधव

# आजपासून आरटीई प्रवेश प्रक्रिया

**बीड । प्रतिनिधी**



शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांसाठी राबविण्यात येणाऱ्या ऑन लाइन प्रवेश प्रक्रियेला आज मंगळवार (दि.१७ फेब्रुवारी) पासून सुरुवात होत आहे. त्यानुसार पालकांना मुलांचे अर्ज १० मार्चपर्यंत भरता येणार असल्याची माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली आहे. आर्थिक दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हक्क कायद्यानुसार इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. यंदाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ९ जानेवारी रोजी शाळा नोंदणी प्रक्रिया सुरू झाली होती. मुदतवाढीसह ही प्रक्रिया ३० जानेवारी रोजी बंद करण्यात आली. जिल्ह्यात प्रवेशासाठी २१३ शाळांची नोंदणी झाली असून २ हजार ४०० जागा उपलब्ध आहेत. मंगळवारपासून प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होत असून पात्र पालकांनी आपल्या पाल्याचे अर्ज वेळेत दाखल करावेत, असे आवाहन मनोज जाधव यांनी केले आहे.

### पोद्दार इंग्लिश स्कूलचे अल्पसंख्यांक प्रमाणपत्र तात्काळ रद्द करा

पोद्दार इंग्लिश स्कूलने आरटीई प्रवेशातून पळवाट काढण्यासाठी अल्पसंख्यांक प्रमाणपत्र घेतले असून हे प्रमाणपत्र नियमबाह्य पद्धतीने शासनाकडून देण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. शाळा सुरू झाल्यानंतर आरटीई प्रवेश टाळण्यासाठी अशा प्रकारे प्रमाणपत्र देणे चुकीचे असल्याचे मत मनोज जाधव यांनी व्यक्त केले आहे. या संदर्भात मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री व शिक्षण संचालक यांच्याकडे रीतसर तक्रार दाखल करण्यात आली असून संबंधित शाळांना देण्यात आलेले अल्पसंख्यांक प्रमाणपत्र तात्काळ रद्द करावे, अशी मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.

### कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य

आरटीई प्रवेशासाठी काही पालकांकडून कागदपत्रांमध्ये अफरातफर झाल्याचे प्रकार यापूर्वी उघडकीस आले होते. त्यामुळे यंदा शिक्षण विभागाने अर्ज भरतानाच आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करणे अनिवार्य केले आहे.

## अजितदादांच्या निधना दिवशीच गैरप्रकार

**मुंबई । प्रतिनिधी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारी रोजी विमान अपगातात अकाली निधन झाले. अजित पवारांच्या निधनाचा संपूर्ण राज्याला धक्का बसला. या निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारच्या वतीने त्याच दुपारी दुखवटा जाहीर केला होता. पण अजित पवार ▶▶ पान २ वर




# कला केंद्रातून परतताना मित्राचा निर्घृण खून

**केज । प्रतिनिधी**

कळंब तालुक्यातील चोराखळी येथील महाकाली कला केंद्रात कार्यक्रम पाहून परतत असताना एका ३७ वर्षीय तरुणाचा त्याच्याच पाच मित्रांनी जुन्या वादातून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. केज तालुक्यातील साळेगाव येथील सतीश भागवत मुंडे असे मृताचे नाव असून, याप्रकरणी येरमाळा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत पाचही संशयित मित्रांना बेड्या ठोकल्या आहेत. ही घटना १२ फेब्रुवारीच्या मध्यरात्री घडली असून, जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी हा कट रचण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मयत सतीश मुंडे हा १२ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास आपल्या पाच मित्रांसह चोराखळी येथील कला केंद्रात नृत्य पाहण्यासाठी गेला होता. मध्यरात्री एक वाजेपर्यंत सर्वांनी कार्यक्रम पाहिला आणि त्यानंतर ते साळेगावकडे परतण्यास निघाले. फिर्यादीनुसार, संशयित आरोपींनी सतीशला आधी मद्यपान करवले आणि त्यानंतर घराकडे परतत असताना जुन्या वादाचा राग मनात धरून त्याला गाठले. चालत्या वाहनात किंवा निर्जन ठिकाणी सतीशला लाथाबुक्क्यांनी पोटावर आणि छातीवर इतकी अमानुष मारहाण करण्यात आली की, गंभीर दुखापतीमुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. ▶▶ पान २ वर



## तरुणाला अमानुष मारहाण

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील मुख्य रस्त्यावर चव्हाण हॉस्पिटलसमोर रविवारी रात्री एक भीषण घटना घडली. गाडीला कट मारल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून शुभम रूपचंद कांबळे या तरुणाला पाच जणांनी मिळून बेदम मारहाण केली. या प्रकरणी जातीवाचक शिवीगाळ आणि जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली माजलगाव शहर पोलिसांनी पाचही संशयितांना ताब्यात घेतले आहे. शुभम कांबळे हा आपली स्कुटी घेऊन मुख्य रस्त्यावरून जात असताना रवी कुऱ्हाडे याने त्याच्या गाडीला कट मारला. शुभमने ‘कट का मारला?’ ▶▶ पान २ वर

## अर्थसंकल्पात कर्जमाफीबाबत घोषणा होण्याची शक्यता

# सरकारने थकीत शेतकरी कर्जदारांचा डेटा मागवला

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राज्य सरकारकडून राज्यातील सर्व बँकांना थकीत कर्जदार शेतकऱ्यांची सविस्तर माहिती शासनाच्या शिंदे समितीकडे पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी काही सकारात्मक घोषणा होऊ शकतात, अशी चर्चा रंगू लागली आहे. विशेषतः थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांमध्ये या हालचालींमुळे आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. जून २०२५ पर्यंत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याचे काम विविध जिल्हा बँकांमार्फत सुरू आहे. नाशिक जिल्हा बँकेनेही या प्रक्रियेत पुढाकार घेतला असून सुमारे ७४ हजार शेतकऱ्यांची माहिती राज्य सरकारच्या अधिकृत पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. यामुळे संपूर्ण राज्यातील थकीत ▶▶ पान २ वर

मराठवाडा पत्र



## संपादकीय

# भक्कम संरक्षण व्यवस्था

देशाची संरक्षण व्यवस्था अधिक भक्कम करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले असून हवाई दलाकडील राफेल विमानांचा ताफा वाढवण्यासाठी संरक्षण मंत्रालयाने फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमानांची खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. तसेच अमेरिकेकडून ६'पी-८आय' टेहळणी विमाने खरेदी करण्यालाही मान्यता दिली आहे. संरक्षण मंत्रालयाच्या संरक्षण सामुग्री खरेदी परिषदेच्या बैठकीत हा निर्णय झाला आहे. फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युअल मॅक्रॉन हे १७ ते १९ फेब्रुवारी दरम्यान नियोजित भारत दौ-यावर येणार आहेत. त्यांच्या भारत दौ-याच्या काही दिवस आधी या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. या व्यवहारामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिकच दृढ होण्याची शक्यता आहे. संरक्षण मंत्रालयाच्या 'डीएसी' म्हणजे संरक्षण खरेदी परिषदेने मान्यता दिलेल्या या कराराची किंमत तब्बल ३.२५ लाख कोटी रुपये एवढी आहे. हा भारताचा आतापर्यंतचा सर्वांत मोठा संरक्षण करार ठरणार आहे. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या संरक्षण एव्हिएशन कॉन्सिलच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. आता या कराराला पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेटच्या संरक्षणविषयक समितीने मान्यता दिल्यानंतर व्यवहाराची पुढील प्रक्रिया पार पडणार आहे. भारतीय हवाई दलाला देशाचे हवाई संरक्षण मजबूत करण्यासाठी ४२ स्क्वाड्रनची आवश्यकता आहे. मात्र, सद्यस्थितीत हवाई दलाकडे केवळ २९ स्क्वाड्रन आहेत. तसेच हवाई दलाच्या ताफ्यामधून अनेक जुनी विमाने निवृत्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर नव्या आणि आधुनिक लढाऊ विमानांची हवाई दलाला नितांत आवश्यकता होती. राफेल विमानासाठी करण्यात आलेल्या करारानुसार १८ राफेल लढाऊ विमाने फ्रान्सच्या दसाँ एव्हिएशनकडून तयार स्थितीत येणार आहेत, तर उर्वरित ९६ विमाने भारतातच तयार करण्यात येतील. यामुळे 'मेक इन इंडिया'च्या मोहिमेला मोठ्या प्रमाणात बळ मिळेल. हा करार 'मेक इन इंडिया' अंतर्गत केला जाईल. डसॉल्ट एव्हिएशन एका भारतीय कंपनीसोबत ही विमाने तयार करेल. अलिकडेच डसॉल्टने 'डसॉल्ट एव्हिएशन्स एरोस्पेस लिमिटेड'मधील आपला हिस्सा ४९ टक्क्यांवरून ५१ टक्के केला आहे. या संयुक्त उपक्रमात अनिल अंबानींची रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरदेखील भागीदार आहे. डसॉल्ट सर्व ११४ राफेल जेटमध्ये भारतीय शस्त्रे, क्षेपणास्त्रे आणि दारूगोळा समायोजित करणार आहे. यासोबतच सुरक्षित डेटा लिंक देखील उपलब्ध करून देईल. ज्यामुळे विमानांना भारतीय रडार आणि सेन्सर प्रणालीशी जोडता येईल. संरक्षण अधिग्रहण परिषदेने अमेरिकेकडून ६'पी-८आय' सागरी देखरेख आणि पाणबुडीविरोधी युद्ध विमानांच्या खरेदीलाही मान्यता दिली आहे. नोव्हेंबर २०१९ मध्ये संरक्षण अधिग्रहण परिषदेने ६'पी-८आय' विमानांच्या खरेदीला मान्यता दिली होती. त्यानंतर अमेरिकेच्या संरक्षण विभागाने एप्रिल २०२१मध्ये सुमारे २.४२ अब्ज डॉलर किमतीच्या विक्रीला मान्यता दिली. पण हा करार आतापर्यंत होऊ शकला नाही. आता या विमानांच्या किमतीत लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे. राफेल खरेदी करारानुसार फ्रान्सची कंपनी दसॉ १८ विमाने तयार स्थितीत पुरवणार असली तरी उर्वरित विमाने टप्प्याटप्प्याने भारतातच ५० टक्क्यांहून अधिक स्वदेशी सामग्रीसह तयार केली जाणार आहेत. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या भारत भेटीच्या चार दिवस आधी हा निर्णय घेण्यात आला आहे. नागपूरमधील डसॉल्ट रिलायन्स एरोस्पेस लि., टाटा, महिंद्रा आणि डायनॅमॅटिक टेक्नॉलॉजी मिळून दरवर्षी २४ ते ३० विमाने तयार करणार आहेत. त्याचबरोबर विमानांची स्थानिक दुरुस्ती, देखभाल आणि आधुनिकीकरणासाठी आवश्यक केंद्र तयार करण्यात येत आहे. संरक्षण तज्ज्ञांनुसार चीनच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील सततचा संघर्ष आणि भारताच्या पश्चिम आघाडीवर पाकिस्तानचा सततचा लष्करी दबाव यामुळे बिघडत चाललेल्या प्रादेशिक सुरक्षा वातावरणाला तोंड देण्यासाठी ही खरेदी अत्यावश्यक आहे. राफेल विमानांच्या खरेदीमुळे चिनी वायुसेना, एरोस्पेस आणि क्षेपणास्त्र परिसंस्था तसेच पाकिस्तानची वृद्धिंगत होत असलेली सामरिक एकात्मता यामुळे निर्माण झालेल्या दोन आघाड्यांवरील वाढत्या लष्करी दबावांना धोरणात्मक प्रतिसाद मिळेल. आज भारतीय वायुसेनेत २९ लढाऊ स्क्वॉड्रन आहेत जे अधिकृत ४२ च्या संख्येपेक्षा खूप कमी आहेत. २०३० दशकाच्या अखेरीस मिग-२१, मिग-२७, जग्वार, मिग-२९ आणि मिराज २००० विमानांच्या निवृत्तीमुळे ही तफावत वाढतच गेली असती. आज चीनकडे २३०० हून अधिक लढाऊ विमाने असून पाकिस्तानकडे जेएफ प्रणालींची २४-२५ स्क्वॉड्रन आहेत. २०३५च्या सुमारास १२६ भारतीय तेजस एमके२ विमान वायुसेनेत दाखल होतील. २०४०पर्यंत आयएएफ २०० राफेल, १८० तेजस एमके १ ए, १२० तेजस एमके २, २०० अपग्रेडेड एमयू ३० एमकेआय आणि एएमसीए स्क्वॉड्रन यांचा समावेश असलेला फोर्स असेल. या संदर्भात २०० हून अधिक राफेल विमानांमुळे भारताच्या हवाई शक्तीतील धोरणात्मक परिवर्तन होऊन ती आगामी काळात भारताच्या हवाई लढाऊ भूमिकेला आकार देईल. पश्चिमेकडे पाकिस्तान सीमा, उत्तरेकडे चीन सीमा आणि पूर्वेकडे बांगलादेशच्या सीमेवर एकाचवेळी ऑपरेशन तयारीला भारत प्राधान्य देणार आहे. या आव्हानाला तोंड देण्यासाठी भारतीय वायुसेना आपली अधिकृत संख्या ५० स्क्वॉड्रनपर्यंत वाढवणार आहे. प्रत्येक स्क्वॉड्रनमध्ये साधारणपणे १८ विमाने असतात. त्यामुळे या नवीन संरचनेसाठी प्रशिक्षण आणि राखीव युनिट्स वगळता सुमारे ९०० लढाऊ विमानांची आवश्यकता असणार आहे. आयात केलेल्या विमानांवरच भारताचे अवलंबित्व, संपूर्ण गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक निर्णय आत्मनिर्भरतेला पूरक ठरेल तरच राफेलची ही आयात परिपूर्ण ठरेल. यामुळे देशांतर्गत आराखडा, उत्पादन आणि तंत्रज्ञानावर आधारित एक सार्वभौम लढाऊ विमान परिसंस्था निर्माण होऊन ती भारतासाठी खरी आयात अध्याय असेल. भारतीय सशस्त्र दलांच्या आधुनिकीकरणाला मोठी गती देण्यासाठी संरक्षण खरेदी परिषदेने अलिकडच्या काळातील दिलेली ही सर्वांत मोठ्या मंजुरीपैकी एक मानली जात आहे. या निर्णयामुळे तिन्ही दलांची युद्धसज्जता आणि प्रतिकारशक्ती अधिक मजबूत होणार आहे. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारत-पाकिस्तान दरम्यान ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करत चार दिवस तीव्र लष्करी कारवाई झाली होती. त्या पार्श्वभूमीवर संरक्षण क्षेत्रातील ही मोठी गुंतवणूक महत्त्वाची मानली जाते. बदलत्या प्रादेशिक समीकरणात भारताने हवाई, स्थल आणि सागरी पातळीवर सज्जता वाढवण्याचा स्पष्ट संदेश या निर्णयातून दिला आहे.

# घात की अपघात?





२८ जानेवारी रोजी झालेल्या भीषण विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाले. या धक्कादायक घटनेनंतर संपूर्ण राज्य अद्याप सावरलेले नसतानाच राष्ट्रवादी काँग्रेसचे (श. प.) आमदार रोहित पवार यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत खळबळजनक दावे केले आहेत. हा अपघात होता की घातपात, असा सवाल करत रोहित पवार यांनी या प्रकरणातील काही संशयास्पद बाबींकडे लक्ष वेधले आहे. रोहित पवार यांनी पुराव्यासह सादरीकरण केले. त्यांनी प्रामुख्याने तीन नावांवर शंका व्यक्त केली. १) व्हीएसआर विमान कंपनी, २) अ‍ॅरो कंपनी, ३) कपूर नावाचा वैमानिक. रोहित पवार यांच्या म्हणण्यानुसार, अ‍ॅरो कंपनीने सरकारी नियमानुसार व्हीएसआरचे विमान भाड्याने घेतले होते. या प्रक्रियेत पवार आडनावाचा एक व्यक्ती हँडलर म्हणून काम करत होता, ज्याने हवामान चांगले असल्याचे सांगितले होते. या कंपन्यांचे राजकीय संबंध असून त्या अनेक राज्यांत कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रकरणाचा तपास सीआयडी करत असली तरी रोहित पवार यांनी या एजन्सीच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले नाही, मात्र त्यांच्या मर्यादा स्पष्ट केल्या. ते म्हणाले, हृदयाचा त्रास असेल तर हृदयाच्याच डॉक्टरकडे जावे लागते, डोळ्यांच्या नाही. सीआयडी हे 'एक्सपर्टीज' नाहीत. या तांत्रिक घटनेचा तपास करण्यासाठी बाहेरच्या तज्ज्ञ कंपन्यांची मदत घेणे आवश्यक आहे. रोहित पवार यांनी राज्य सरकारला महत्त्वाची विनंती करताना म्हटले की, विमानाचा ब्लॅक बॉक्स तपासताना आणि त्यातील रेकॉर्डिंग ऐकताना पवार कुटुंबातील एका सदस्याला तज्ज्ञांसोबत उपस्थित राहण्याची संधी द्यावी. त्यामुळे तपासात पारदर्शकता राहील आणि सत्य समोर येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विमानतळावर पोलिसांच्या प्रवेशाला मर्यादा असल्याने या प्रकरणात तांत्रिक तज्ज्ञांचे मत सर्वाधिक महत्त्वाचे ठरेल असे त्यांनी स्पष्ट केले. या खळबळजनक दाव्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, सरकार रोहित पवारांच्या मागणीवर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. रोहित पवार यांनी सादरीकरणात म्हटले की, मुंबई ते बारामतीचे अंतर २१० किमी सांगण्यात आले. या प्रवासासाठी २७ मिनिटे लागतात असेही सांगण्यात आले.विमान कंपनीचे विजयकुमार सिंग आणि रोहित सिंग हे दोन मालक आहेत. रोहित पवार यांनी अपघाताच्या तांत्रिक बाजूवरच बोट ठेवले नाही, तर यामागे एखादे मोठे षडयंत्र असण्याची शक्यताही वर्तवली आहे. या अपघातामागे आर्थिक कंत्राटे आणि राजकीय वादाची किनार असावी असा संशय व्यक्त करताना रोहित पवार म्हणाले, या अपघातापूर्वी काही महिने आम्ही सातत्याने एकत्र होतो. मी स्वत: अजित पवार आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिका-यांच्या संपर्कात होतो. त्या काळात एका राजकीय सल्लागाराचे कोट्यवधी रुपयांचे कंत्राट रद्द करण्याबाबत गंभीर चर्चा सुरू होती. एका मोठ्या आर्थिक व्यवहारावरून निर्माण झालेला हा वाद आणि त्यानंतर घडलेला हा अपघात, यांचा परस्पर संबंध असू शकतो, असा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. आर्थिक वादाच्या या पार्श्वभूमीवर बोलताना रोहित पवार यांनी थेट घातपाताचा प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले, विशिष्ट हितसंबंध जपणा-या व्यक्तींचे कोट्यवधीचे कंत्राट धोक्यात आल्यामुळे, हा अजित पवार यांच्या जीवावर बेतणारा कट तर नव्हता ना? रोहित पवार यांनी आपल्या सादरीकरणात विमानाची तांत्रिक वैशिष्ट्ये आणि प्रवासादरम्यानचे 'लॉग बुक्स' यावरही प्रकाश टाकला. अत्यंत कमी वेळेत पार पडलेला हा प्रवास आणि त्यानंतर झालेला अपघात, हा केवळ योगायोग नसून त्यामागे गंभीर कारणे असू शकतात. नेमका अपघात कसा झाला आणि विमानाच्या देखभालीची जबाबदारी कोणाची होती? असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला. 'लेअरजेट' विमान अत्यंत वेगवान आणि अधिक उंचीवरून प्रवास करण्यासाठी ओळखले जाते. हे विमान १६ वर्षांपूर्वीचे होते. विमान कंपनीच्या मालकांनी दावा केला होता की, विमान सुस्थितीत होते, त्याची देखरेख उत्तम होती आणि वैमानिक देखील अनुभवी होते. धुक्यामुळे हा अपघात झाला असावा असे कंपनीचे म्हणणे आहे. रोहित पवार यांनी याला आक्षेप घेतला आहे. घटनास्थळावरील स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीवरून विमानाचा आवाज इतर विमानांपेक्षा वेगळा आणि असामान्य येत होता. यावरून विमानाची देखरेख योग्य पद्धतीने झाली नसावी. विमान अपघाताच्या चौकशीवरून रोहित पवार यांनी संशयाची सुई नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडे (डीजीसीए) वळवली आहे. विमानाची तांत्रिक स्थिती, देखभालीच्या नोंदी आणि तपास यंत्रणांची कार्यपद्धती यावर त्यांनी गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. या प्रकरणात डीजीसीएचे काही अधिकारी संबंधित खासगी कंपनीत कार्यरत असल्याचा दावा करत रोहित पवार यांनी तपासाच्या पारदर्शकतेवर शंका उपस्थित केली आहे. गत काही दिवसांपासून तपास यंत्रणांनी केवळ सीसीटीव्ही फुटेज गोळा करण्यावर भर दिला आहे. त्यामुळे मूळ तांत्रिक अहवाल बदलला जाण्याची किंवा पुराव्यांशी छेडछाड होण्याची भीती वाटते. हा अपघात केवळ 'धुके आणि दृश्यमानता' या कारणाखाली दडपण्याचा प्रयत्न करू नये असा इशाराही त्यांनी दिला. एका बाजूला तांत्रिक बिघाडाचे संकेत मिळत असताना, दुस-या बाजूला तपास यंत्रणांच्या संथ गतीमुळे आणि संशयास्पद हालचालींमुळे हा अपघात नसून घातपात असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे रोहित पवार म्हणाले. या अपघातामागे व्हीएसआर विमान कंपनीचा निष्काळजीपणा आणि नियमांचे उल्लंघन कारणीभूत असल्याचे सांगत रोहित पवार यांनी अनेक धक्कादायक तांत्रिक बाबी उघड केल्या आहेत. वैमानिक सुमीत कपूर यांच्या वादग्रस्त वर्तणुकीवर रोहित पवार यांनी गंभीर आरोप केले आहेत. कपूर यांना यापूर्वी मद्यपान केल्याप्रकरणी निलंबित करण्यात आले होते. विमानाच्या उड्डाण नोंदी आणि नियंत्रण कक्षाच्या संवादात मोठी तफावत असल्याचे रोहित पवार यांचे म्हणणे आहे. या विमान कंपनीला युरोपात हवाई वाहतूक करण्यास बंदी घातलेली असताना भारतात परवानगी कशी दिली गेली, वैमानिक व्यसनी होता का? असे विविध प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केले आहेत. सर्व घटनाक्रम आणि त्यातील त्रुटी निदर्शनास आणून रोहित पवार यांनी हा अपघात नसून घातपात असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

## पान १ वरून

### विजेच्या धक्क्याने...

नागरिकांनी महावितरणच्या कारभारावर ताशेरे ओढले आहेत. स्थानिक नागरिकांच्या मते, या डीपीची दुरवस्था आणि त्यातून होणारा धोका याबाबत वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. बीड शहरात अशा अनेक ठिकाणी उघड्या डीपी मृत्यूचा सापळा बनून उभ्या आहेत. महावितरणचे अधिकारी शहरातील विजेच्या पायाभूत सुविधांकडे लक्ष देण्याऐवजी केवळ कंत्राटदार (गुत्तेदार) पोसण्यात मग्न असल्याचा गंभीर आरोप नागरिक करत आहेत. कधी शॉर्ट सर्किटमुळे आगी लागतात, तर कधी अशा प्रकारे निष्पापांचा बळी जातो, तरीही प्रशासन कुंभकर्णी झोपेतून जागे व्हायला तयार नाही.

### आजपासून आरटीई...

✻ महत्त्वाच्या सूचना : आरटीई पोर्टलवर निवासस्थानापासून १ कि.मी. किंवा त्यापेक्षा कमी अंतरावरील शाळांची माहिती दिसेल. एकापेक्षा अधिक अर्ज भरल्यास कोणताही अर्ज लॉटरी प्रक्रियेसाठी ग्राह्य धरला जाणार नाही. पालकांना किमान दहा शाळांची निवड करावी लागेल. केवळ मेसेजवर अवलंबून न राहता पोर्टलवरील सूचनांचे पालन करावे. चुकीची माहिती दिल्यास कोणत्याही टप्प्यावर प्रवेश रद्द करण्यात येईल. अर्ज भरताना निवासस्थानाचा पत्ता अचूक नमूद करणे आवश्यक आहे. ✻ ही कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य : १) आई किंवा वडिलांचे आधार कार्ड २) बालकाचे जन्मप्रमाणपत्र व वास्तव्याचा पुरावा ३) भाडेतत्त्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत (सर्व संबंधित घटकांसाठी अनिवार्य) ४) सामाजिक वंचित घटकांसाठी - पालकांचा/बालकाचा जात दाखला व अपंगत्वाचे प्रमाणपत्र (परराज्यातील जात प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.) ५) आर्थिक दुर्बल घटकांसाठी - पालकांचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला रुपये एक लाखांपेक्षा कमी (सन २०२३-२४ किंवा २०२४-२५ या वर्षांतील दाखला ग्राह्य)

### कला केंद्रातून...

या प्रकरणी मयताचे वडील भागवत बळीराम मुंडे यांनी १५ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री येरमाळा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तातडीने हालचाली करत शेख अजमोद्दीन ऊर्फ मुन्ना शेख जिलानी, शेख शकील रौफ, संजय जनार्धन गिते, मधुकर गोरोबा इंगळे आणि दत्ता बाबासाहेब तोंडे या पाच संशयितांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी पाचही आरोपींना अटक केली असून, पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल भोजगुडे या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. ही मारहाण नेमकी कुठे झाली आणि खुनामागचे नेमके कारण काय होते, याचा शोध आता पोलीस घेत आहेत. या घटनेमुळे चोराखळी येथील कला केंद्र पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. कला केंद्रांमध्ये होणारी गर्दी आणि तेथे सतत उद्भवणारे वाद यामुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. एका तरुणाचा अशा प्रकारे बळी गेल्याने साळेगाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अशा केंद्रांवर पोलिसांचा कठोर वचक असायला हवा, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

### तरूणाला अमानुष...

अशी विचारणा केली असता, रवीने त्याला जातीवाचक शिवीगाळ करत गाडीला पाठीमागून धडक दिली. त्यानंतर रवी कुऱ्हाडे आणि लक्ष्मण शिंदे यांनी इतरांना जमवून शुभमला खाली पाडून मारहाण करण्यास सुरुवात केली. शुभमने जिवाच्या भीतीने पळून जाण्याचा प्रयत्न केला असता, विशाल, विलास आणि राहुल चव्हाण यांनी त्याला पकडून ठेवले. यावेळी रवी कुऱ्हाडे याने शुभमचा गळा दाबून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला, तर लक्ष्मण शिंदे याने त्याला अवघड जागेवर आणि छातीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. शुभमचे वडील रूपचंद कांबळे हे मुलाला वाचवण्यासाठी धावले असता, त्यांनाही जातीवाचक शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.

## पान १ वरून

### सरकारने थकीत...

कर्जदारांचा अचूक आकडा शासनासमोर येणार आहे. नाशिक जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद शिंदे यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, राज्य शासनाच्या मदतीसाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीकडून ३० जून २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीतील थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती मागवण्यात आली आहे. जिल्ह्यातील सेवा सहकारी सोसायट्या, त्यांचे सचिव, बँकेचे तपास अधिकारी आणि शाखाधिकारी यांच्या माध्यमातून माहिती संकलन सुरू आहे. तसेच सहनिबंधक आणि निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांचेही सहकार्य मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश म्हणजे राज्यातील खऱ्या अर्थाने थकीत असलेल्या शेतकऱ्यांची स्पष्ट यादी तयार करणे हा आहे. शासनाच्या पोर्टलवर माहिती अपलोड झाल्यानंतर पुढील निर्णय घेणे सोपे जाणार आहे. कर्जमाफीचा निर्णय घ्यायचा झाल्यास अचूक आकडेवारी महत्त्वाची ठरणार असल्याचे प्रशासनातील सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे बँकांकडून माहिती संकलन आणि पडताळणी या दोन्ही गोष्टींना प्राधान्य दिले जात आहे. दरम्यान, राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणार आहे. हे अधिवेशन २५ मार्च २०२६ पर्यंत चालणार असून ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. राज्याच्या विधिमंडळाचे हे महत्त्वाचे अधिवेशन मुंबईत पार पडणार आहे. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर कर्जमाफीचा विषय अधिकच चर्चेत आला आहे. शेतकरी वर्गाचे लक्ष आता अर्थसंकल्पाकडे लागले आहे. यंदाच्या अधिवेशनात एक वेगळी बाब घडणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे यावेळी अर्थसंकल्प सादर करण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर असणार आहे. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत अधिवेशनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली. पहिल्याच दिवशी दोन्ही सभागृहांमध्ये शोक प्रस्ताव मांडण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. एकूणच, कर्जमाफीच्या दृष्टीने सरकारकडून सुरू असलेली माहिती संकलनाची मोहीम आणि आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशन यामुळे शेतकऱ्यांमध्ये अपेक्षा वाढल्या आहेत. ७४ हजार शेतकऱ्यांची माहिती आधीच पोर्टलवर अपलोड झाली असून उर्वरित माहिती लवकरच पूर्ण होणार असल्याचे संकेत आहेत. या पार्श्वभूमीवर ६ मार्च रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी कोणती गोड बातमी जाहीर होते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### अजितदादांच्या निधनादिवशीच...

यांच्या निधनाच्या दिवशीच मंत्रालयात गैरप्रकार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्या निधानानंतर तात्काळ राज्यात दुखवटा जाहीर केला होता. त्यावेळी शासकीय सुट्टी जाहीर झालेली होती. इकडे राज्यात दुखवटा असताना दुसरीकडे अल्पसंख्याक विकास विभागात मात्र एक वेगळाच प्रकार सुरू होता. अत्यंत गंभीर बाब म्हणजे, दुखवटा आणि सुट्टीच्या दिवशी तसेच कार्यालयीन वेळ संपल्यानंतरही रात्री उशिरापर्यंत या विभागात डिजिटल प्रमाणपत्रांचे वाटप सुरू होते, असा आरोप युवक काँग्रेस ने केला आहे. ✻ नेमका आरोप काय आहे? : अजितदादा यांच्या अकाली निधनानंतर राज्यभर शासकीय दुखवटा होता आणि कार्यालयांना सुट्टी होती. पण त्या दिवशी काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी संगनमताने डिजिटल स्वाक्षरीचा वापर करून अल्पसंख्याक दर्जाची प्रमाणपत्रे वाटप केल्याचा आरोप युवक काँग्रेसचे अक्षय जैन यांनी केला आहे. या आरोपानंतर राज्यात खळबळ उडाली आहे. जैन यांच्या आरोपात किती तथ्य आहे? याचा तपास केला जाण्याची शक्यता आहे. पण राज्यात दुखवटा असताना असा गैरप्रकार झाल्याने राज्य सरकारवर टीका होत आहे. ✻ अजित पवारांच्या निधनादिवशीच मंत्रालयात गैरप्रकार? : अजित पवार यांच्या निधनाच्या दिवशीच मंत्रालयात गैरप्रकार सुरू असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. अल्पसंख्याक विभागातून प्रमाणपत्रांचे वाटप करणारा गॉडफादर कोण आहे? असा प्रश्न युवक काँग्रेसचे अक्षय जैन यांनी उपस्थित केला आहे. आर्थिक हितसंबंधातून आणि पैशांच्या मोबदल्यात या अधिकाऱ्यांनी नियमबाह्यरीत्या ही प्रमाणपत्रे दिले आहेत का? असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



## थोडक्यात...

### ना.पंकजाताई मुंडे यांनी घेतले प्रभू वैद्यनाथाचे दर्शन

#### महाशिवरात्री निमित्त परळीत शिवभक्तांची मांदियाळी



**परळी वै. । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतले. प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी महाशिवरात्री निमित्त राज्याच्या तसेच देशाच्या कानाकोपर्यातून लाखो भाविकांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी पंकजाताई मुंडे यांनी वैद्यनाथ मंदिरात जाऊन ज्योर्तिलिंगाचे दर्शन घेतले. वैद्यनाथ देवल कमिटीचे अध्यक्ष व तहसीलदार व्यंकटेश मुंडे, विश्वस्त राजेश देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले. पंकजाताई मुंडे दर्शन घेऊन बाहेर आल्यानंतर मंदिराच्या प्रांगणात जमा झालेल्या महिला, युवक, युवती व सर्व सामान्य नागरिकांनी त्यांचेसोबत सेल्फी घेण्यासाठी त्यांना एकच गराडा घातला. सेल्फीसाठी प्रत्येकांची झुंबड उडाली होती, पंकजाताईंनी देखील यासाठी सर्वांना आवर्जून मनसोक्त वेळ देत सर्वांची इच्छा पूर्ण केली तसेच भाविकांना महाशिवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. भाविकांना उपवासाची खिचडी मोफत वाटप करण्यासाठी परळी नगरपरिषद तसेच भाजपचे युवा नेते निळकंठ चाटे यांनी उभारलेल्या स्टॉलला ना. पंकजाताई मुंडे यांनी भेट दिली, त्यांच्या हस्ते दर्शनासाठी आलेल्या भाविकांना खिचडीचे वाटप करण्यात आले.

### राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त बीडमध्ये १५० प्रतिमांचे वाटप



**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त बीड शहरात अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात १५० प्रतिमांचे वाटप करण्यात आले. शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या पुतळ्याजवळ हा कार्यक्रम संपन्न झाला. समाजप्रबोधन, स्वच्छता आणि सेवा या त्यांच्या विचारांचा जागर जागर प्रसार व्हावा, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बीडचे रहिवासी व सध्या धाराशिव पोलीस ठाण्यातून सेवानिवृत्त पीएसआय किशोर रोकडे यांच्या हस्ते प्रतिमांचे वितरण करण्यात आले. त्यांच्या हस्ते झालेल्या या वितरणामुळे कार्यक्रमाला विशेष गौरव प्राप्त झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य परीट धोबी समाजसेवा मंडळाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा विभागीय युवक अध्यक्ष ॲड. सुधीर जाधव हे होते. यावेळी परीट समाजाचे ज्येष्ठ नेते दत्तात्रय नलावडे, राज्य कार्याध्यक्ष गणेश जगताप, जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके, पप्पू शिंदे, जगन्नाथ शिंदे, रवी जाधव, जिल्हाध्यक्ष मोहन राऊत, गणेश राऊत, जिल्हा सचिव प्रवीण साळुंके, जिल्हा उपाध्यक्ष जिजा शिंदे, मराठवाडा विभागीय युवक उपाध्यक्ष संतोष पवार, उपाध्यक्ष शितल राऊत, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, शहर कार्याध्यक्ष संतोष भालेकर तसेच राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष संजय साळुंके, उपाध्यक्ष नितीन नवले, सचिव महेंद्र वाघमारे, बाबू भालेकर, विक्रम वाघमारे, किशोर जाधव, उमा शंकर जाधव, प्रविण जगताप, नारायण राऊत, अजय जाधव, संतोष मस्के, नवले अभिषेक, जाधव संजय, वाघमारे महेश शिंदे,मनोज वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शेतकऱ्यांनी शासनाच्या पोर्टलवर डाटा अपलोड करण्यासाठी दोन दिवसात आधार कर्ड जमा करा : शरद ठोंबरे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील सर्व शेतकरी यांना आवाहन करण्यात येते की, राज्यातील शेती क्षेत्रात आणि शेतकर्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतक-यांची थकीत कर्जाच्या विळख्यातुन सोडवणूक करण्यासाठी आपत्कालीन व दीर्घकालिन उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने शेतीकर्जाची माहिती पोर्टलवर भरण्याबाबत शासनाचे युध्द पातळीवर कामकाज सुरु असुन ही माहिती शासनाने पोर्टलवर भरण्यासाठी सर्व थकबाकीदार शेतक-यांचे केवायसी करणे आवश्यक असल्यामुळे त्यांचे आधार नंबर आवश्यक आहेत. तरी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटया व बँकेकडे बहुतांश शेतक-यांचे आधार कार्ड उपलब्ध नाहीत त्यामुळे सर्व शेतकर्यांना विनंती करण्यात येतें की, बीड जिल्हयातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमार्फत व बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत घेतलेल्या कर्जाबाबत शेतक-यांचे केवायसी करणे आवश्यक असल्याने तसेच जे शेतकरी मयत झाले असतील त्यांच्या वारसांनी विविध सेवा' सहकारी संस्था व बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेत वारसांची नावे देऊन सर्वांनी त्यांचे आधार कार्ड संबंधीत गटसचिव व बँकेचे शाखाधिकारी यांचेकडे जमा करावेत असे आवाहन बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., बीड तर्फे करण्यांत आले होते परंतु बीड जिल्हयातील शेतकरी यांनी त्यांचे आधारकार्ड बीड जिल्हा बँकेच्या शाखेत तसेच सेवा सहकारी संस्थेत जमा केल्याचे दिसून येत नाही. शासनाने अजुन दि. १८.०२.२०२६ पर्यंत योजनेस मुदतवाढ दिलेली आहे तरी दि. १८.०२.२०२६ पर्यंत थकबाकीदार शेतक-यांनी त्यांचे आधारकार्ड बीड जिल्हा बँकेच्या शाखेत किंवा सेवा. सहकारी संस्थेच्या गटसचिव यांचेकडे जमा करावेत दि. १८.०२.२०२६ पर्यंत आधारकार्ड न दिल्यास या योजनेपासून वंचीत राहील्यास संस्थेचे चेअरमन, संचालक मंडळ वं संबंधीत थकबाकीदार सभासद हे जबाबदार राहतील याची बीड जिल्हयातील सर्व थकबाकीदार शेतक-यांनी नोंद घ्यावी व आपले आधार कार्ड दोन दिवसात म्हणजे दि. १८.०२.२०२६ पर्यंत बीड जिल्हा बँकेत किंवा सेवा सहकारी सोसायटीकडे दयावेत हि विनंती.

# गेवराईत पंचायत समितीतील कर्मचाऱ्यांचे विविध मागण्यासाठी असहकार आंदोलन

**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत प्रशासनाचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या सर्व विभागातील लिपीक संवर्गाच्या चौथ्या वेतना आयोगापासुन वेतनश्रेणीत असलेली तफावत दूर करुन सुधारीत वेतन श्रेणी लागू करणे, जशाच तशी जुनी पेन्शन लागू करणे, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपाच्या प्रतिक्षा सुचीवर असलेल्या सर्वांना जुनी पेन्शन जशासतशी चालु करणे, गोदावरी महामंडळास स्वायता करत असतांना वर्ग-३ व वर्ग ४ कर्मचा-यांचे वेतन पुवीप्रमाणे कोषागार कार्यालयामार्फत करणे यासह विविध मागण्यासाठी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने गेवराईत पंचायत समिती कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून निवेदन देवून असहकार आंदोलन करण्यात येत आहे.

जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत व प्रशासनाचा मुख्य



आधारस्तंभ असलेल्या सर्व ४२६ विभागातील लिपीक संवर्गाच्या चौथा वेतन आयोगापासुन वेतन श्रेणीत असलेली तफावत दुर करुन सुधारीत वेतनश्रेणी लागू करणे व १ नोव्हेंबर २००५ पुर्वी अनुकंपाच्या प्रतिक्षा सुधिवर असलेल्या सर्वांना जुनी पेन्शन लागू करणे. या मागण्याकरीता प्रशासनाचे लक्ष वेधणेसाठी सनदशीर मार्गाने खालील प्रमाणे असहकार आंदोलन करण्यात येत आहे. यामध्ये दि.१६ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत कार्यायलयात काळ्या फित लावून बसणे, दि.१८ फेब्रुवारी रोजी कार्यालयासमोर शांतता पुर्वक प्रलंबित मागण्या संदर्भात घोषणा देणे, दि.२० फेब्रुवारी रोजी मागण्यांसाठी पाठपुरावा करणे तर दि.२३ फेब्रुवारी २०२६ रोजी पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनचे निवेदन पंचायत समिती कार्यालय अधिक्षक नायगावकर यांनी स्विकारले असून दिलेल्या निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष देशमुख आर. पी., उपाध्यक्ष परशुराम पालिमकर , कोषाध्यक्ष रमेश गिरी, सचिव सचिन गिरी, महिला संपर्क प्रमुख श्रीमती अंबिका साळुंखे, श्रीमती रोहिणी येरडलवार , घनश्याम वैष्णव, गजानन जाधव, दिंगाबर अकोलवाड, आलमगिर तांबोळी, ज्ञानेश्वर मोहिते, शकिल पठाण, बंडु राठोड, विशाल तळेकर, मनोज अविळे , हनुमंत डोईफोडे यांच्या सह आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मादळमोही ग्रामपंचायतीचा 50 दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी 3000 रुपयांच्या निधीचे वाटप

**गेवराई । प्रतिनिधी**

सामाजिक न्यायाची भूमिका प्रत्यक्ष कृतीत उतरवत मादळमोही ग्रामपंचायतीच्या वतीने दिव्यांग कल्याणासाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीचे यशस्वी वाटप करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत गावातील ५० दिव्यांग लाभार्थ्यांना प्रत्येकी ३००० रुपयांच्या आर्थिक मदतीचे धनादेश सुपूर्द करण्यात आले.

दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना आर्थिक आधार




देण्यासाठी शासकीय नियमानुसार ५ टक्के निधी राखीव ठेवला जातो. मात्र, अनेक ठिकाणी या निधीच्या वाटपासाठी विलंब होतो. मादळमोही येथे शिवसेना तालुकाप्रमुख अजय भैय्या दाभाडे आणि शेख राजू (भाई राजा) यांनी विशेष तत्परता दाखवत हा निधी गरजूंपर्यंत वेळेत पोहोचवण्याचे नियोजन केले. त्यांच्या या पुढाकारामुळे लाभार्थींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यावेळी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, दिव्यांग बांधवांच्या हक्काचा निधी त्यांना सन्मानाने आणि वेळेत मिळवून देणे हे आमचे कर्तव्य आहे. सामाजिक उत्तरदायित्व जपण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत. वेळेत निधी मिळाल्याबद्दल ग्रामस्थांनी आणि लाभार्थ्यांनी अजय भैय्या दाभाडे, शेख राजू (भाई राजा) आणि ग्रामपंचायत प्रशासनाचे आभार मानले आहेत.

### आहरण संवितरण अधिकाऱ्यांची कार्यशाळा निवृत्तीवेतनधारकांच्या अडचणीही सोडवणार

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

महालेखापाल लेखा व हकदारी, नागपूर व वरिष्ठ कोषागार कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचे द्वारा (EAPPO) आणि निवृत्तीवेतन समाधान या नविन उपक्रमांबाबत माहिती देण्याकरिता सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची बुधवार दि. १८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेमध्येसंदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार असून सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी सकाळी ११ वा. उपस्थित राहावे. तसेच त्याच दिवशी दुपारी अडीच वा. छत्रपती संभाजीनगर कोषागार मार्फत निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारक कुटुंबनिवृत्तवेतन धारक यांच्या निवृत्तीवेतन संबधित अडीअडचणी जाणून घेऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी झएछडखजछ– अदालत महालेखापाल लेखा व हकदारी, नागपूर व वरिष्ठ कोषागार कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांचे द्वारा आयोजित करण्यात येत आहे. निवृत्तीवेतन कुटूंबनिवृत्तीवेतनधारकांच्या महालेखापालस्तरावरील असलेल्या अडीअडचणी परस्पर समन्वयाने सोडविण्यावर विशेषत्वाने भर दिला जाणार आहे. तरी संबंधितानी अभिलेख्यासह बुधवार दि. १८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे दुपारी अडीच वा.

# श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान, कुर्ला येथे महाशिवरात्री सप्ताहाची भक्तीमय सांगता

**कुर्ला । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान महादेव मळी येथे महाशिवरात्रीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सप्ताहाची सांगता दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी अत्यंत भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सप्ताहाच्या निमित्ताने कुर्ला तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांना महाराष्ट्रातील विविध संतांचे विचार, अध्यात्मिक संदेश आणि कीर्तनरूपी मार्गदर्शन ऐकण्याची संधी लाभली. सप्ताहभर धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन व प्रवचनांमुळे परिसरात भक्तीचा दरवळ निर्माण झाला होता. विशेष म्हणजे, या सप्ताहादरम्यान परिसरातील भाविकांना वाराणसी (काशी) येथील पद्मश्री गणेश्वरशास्त्री द्राविड गुरुजी यांच्या दर्शनाचा लाभही मिळाला. त्यांच्या उपस्थितीमुळे सप्ताहाला अधिक आध्यात्मिक अधिष्ठान लाभले. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी काल्याच्या कीर्तनाची सेवा मठाधिपती ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मस्के यांनी केली. आपल्या प्रभावी



कीर्तनातून त्यांनी सुसंगतीचे महत्त्व, अध्यात्मातील विविध विषय तसेच भगवंताचे स्मरण व सत्संग जीवनात किती आवश्यक आहे यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांच्या ओजस्वी वाणीने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहून महादेवाचे दर्शन घेतले. संपूर्ण परिसर हर हर महादेवच्या जयघोषाने दुमदुमून गेला. संगमेश्वर संस्थानच्या वतीने सप्ताह यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्व भक्त, ग्रामस्थ व सेवेकऱ्यांचे आभार मानण्यात आले. अशा धार्मिक उपक्रमांमुळे समाजात आध्यात्मिक वातावरण निर्माण होऊन सामाजिक एकोपा दृढ होतो, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## राज्यस्तरीय पुरस्कार ही माझ्या आयुष्यातली मोठी कमाई– गुलाब भाई शेख यांना राज्यमंत्री बच्चु भाऊ कडू. रविकांत दादा तुपकर यांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत कर्मचारी पुरस्कारने सन्मानित

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मौजे कल्याणनगर येथील ग्रामपंचायत शिंपेटाकळी कर्मचारी व टायगर ग्रुप सामाजिक संघटना कार्यकर्ते गुलाब भाई शेख यांच्या कार्याची दखल घेत गुलाब भाई शेख यांना माजी राज्यमंत्री बच्चु भाऊ कडू व राज्यमंत्री रविकांत दादा तुपकर, खासदार भाऊसाहेब वाकचौरे साहेब व वर्ष २०२६ ज्यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर असे कलावंत रघुवीर खेडकर साहेब यांच्या हाताने प्रसिद्ध तीर्थस्थळ नाशिक सिन्नर या ठिकाणी सनमानीत करण्यात आले यांना महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघ माजलगाव तालुका व बीड



जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचारी संघटणा बांधणी मजबुत संघटीत करुन ग्रामपंचायत कर्मचारी कामगारासाठी अहोरात्र काम करत त्यांचे प्रलंबित प्रश्नावर मोर्चे उपोषण करुन संविधानाने दिलेल्या अधिकाराचा वापर करून न्याय मिळुन दिल्याचे काम केले

ग्रामपंचायत कर्मचारी हा गाव खेड्यातला सर्वात शेवठचा घटक असुन तो सर्वात महत्वाचा आहे हे लक्षात आनुन देन्याचे काम करत आहेत तूट पुंज्या वेतनावर हा कर्मचारी काम करत असतो व सर्व गावातील जनतेला सेवा देतो म्हणूनच मला राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत कर्मचारी गुणगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. व मला सामाजिक कार्याची आवड आसल्यामूळे मी सतत गोर गरीब दिन दुबळ्याच्या कामाला सर्व प्रथम प्राधान्य देतो व मी ग्रामपंचायत कर्मचारी आसल्यामुळे माजलगाव तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचारी व माझ्या गावचे सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी साहेब व गावातील युवा नेते कार्यकर्ते व वरिष्ठ मार्गदर्शक जेष्ठ नागरिक नागरिकांकडून अभिनंदन होत आहे

## अंबाजोगाईत शेखर मुंदडा यांचे माहेश्वरी समाजाला मार्गदर्शन ; शिक्षण आणि गोसेवेवर दिला भर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरात आयोजित माहेश्वरी समाजाच्या विशेष बैठकीत महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष आणि माहेश्वरी विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी समाजहिताच्या विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. समाजातील एकही घटक शिक्षणापासून वंचित राहू नये आणि गोवंशाचे रक्षण व्हावे, या उद्देशाने राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी यावेळी दिली. मुंदडा यांनी आपल्या भाषणात शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि आध्यात्मिक मूल्यांच्या जोपासनेवर विशेष भर दिला. माहेश्वरी विद्याप्रसारक मंडळाच्या माध्यमातून दरवर्षी



पाच कोटी रुपयांच्या शिष्यवृत्तीचे वाटप केले जाते, अशी महत्त्वपूर्ण माहिती मुंदडा यांनी दिली. आर्थिक परिस्थितीअभावी समाजातील कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, यासाठी संस्था कटिबद्ध असून गरजू विद्यार्थ्यांना १०० टक्के मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न कमी आहे, त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी 'स्वावलंबन' योजना प्रभावीपणे राबवली जात आहे.

# बेरोजगार युवकांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीची सुवर्णसंधी: जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील

**बीड । प्रतिनिधी**

वाढत्या बेरोजगारीमुळे हतबल झालेल्या युवकांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने रविवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, डी.पी. रोड येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून. सदरील रोजगार मेळाव्यात मेळाव्यात पुणे, चाकण, रांजणगाव व पिंपरी-चिंचवड येथील अनेक नामांकित कंपन्या सहभागी होऊन युवकांना



रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार आहेत. बीड जिल्ह्यातील बेरोजगार तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवसेना ( उ.बा.ठा) जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील यांनी केले आहे.

या रोजगार मेळाव्यात फ्रेशर युवकांसाठी नामांकित ऑटोमोबाईल आणि मॅन्युफॅक्चरिंग कंपनीमध्ये कमवा आणि शिका निशुल्क मेकाट्रॉनिक्स डिप्लोमा करण्याची सुविधा आणि अप्रेंटिसशिप ट्रेनिंग जॉब करण्याची संधी उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी १८ ते २८वर्षे वयोगटातील यासाठी उमेदवाराचे शिक्षण हे दहावी, बारावी पास ,आयटीआय, पदवीधर असावे लागेल. उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार नोकरी मिळेल. कमवा आणि शिका च्या योजनेत कोर्स कालावधी हा बारावी पास साठी तीन वर्षे ,आयटीआय पास साठी दोन वर्षे असेल निवड झालेल्या उमेदवारांना मासिक वेतन १४००० ते २०००० रुपये पर्यंत मिळेल. बस, कॅन्टीन व मेडिकल इन्शुरन्स सुविधा देखील देण्यात येणार आहे. या मेळाव्यात सहभागी कंपन्यांमध्ये Tata Motors, Bajaj Auto, Whirlpool ,Fiat Auto, Tasty Bites तसेच ढींर त्रीशशप इर्रीिंशीळशी या नामांकित कंपनीत काम करण्याची संधी मिळेल. निवड झालेल्या उमेदवारांना पिंपरी चिंचवड विद्यापीठातर्फे अभियांत्रीकी डिप्लोमा मेकॅट्रॉनिक्स करण्याची संधी मिळेल. कमवा आणि शिका योजनेसोबत मासिक मानधन आणि इतर लाभ मिळतील याकरिता उमेदवाराकडून कसलेही शुल्क आकारण्यात येणार नाही. संपूर्णपणे मोफत प्रशिक्षण असेल प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर रोजगारासाठी सहाय्य करण्यात येईल फक्त उमेदवारांमध्ये उत्पादन प्रकल्पामध्ये काम करण्याची तयारी असावी शिकण्याची आवड असावी ऑटोमोबाईल क्षेत्रात करिअर घडवण्याची इच्छा असावी तेव्हा निवड झालेल्या उमेदवारांना पुढील प्रक्रियेसाठी संपर्क केला जाईल आपल्या बेरोजगारीवर मात करण्यासाठी या संपूर्ण संधीचा फायदा करून घ्यावा व उमेदवारांनी आपले अर्ज जास्तीत जास्त प्रमाणात दाखल करावे असे आवाहन शिवसेना (उ.बा.ठा)चे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील यांनी केले आहे..

दैनिक

# मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ ●

## थोडक्यात...

### ढेकणमोहा तांडा येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



**ढेकणमोहा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील ढेकणमोहा तांडा येथे बंजारा समाजाचे आद्यदैवत, थोर तत्वज्ञ, महान विचारवंत, समाजसुधारक श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती प्रतिवर्षा प्रमाणे साजरी करण्यात आली यां प्रसंगी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार पिपळनेर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मधुसूदन घुगे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी चंदकांत फड बीड जिल्हा कोषाध्यक्ष भाजप, भाऊराव नाना सुरवसे, डॉ. अमोल घुमरे सर, उद्धव दादा म्हेत्रे, बाबासाहेब काळे, नागेश शिंदे माजी सरपंच ढेकणमोहा, विष्णू पवार माजी सरपंच ढेकणमोहा तांड, साहेबराव पवार माजी उपसरपंच, दयाराम पवार सरपंच, जेष्ठ सदस्य गोवर्धन पवार उपसरपंच बाजीराव पवार, भागवत खाकरे, अविनाश गवळी, नवनाथ धुमाळ, युवा नेते कैलास पवार, बाजीराव पवार, ,, नवनाथ आडे, देवीदास पवार, हरिभाऊ पवार, एकनाथ आडे, सुभाष आडे, रघुनाथ पवार, सुभाष पवार, शेषेराव पवार, नवनाथ नाथा पवार, धनु पवार, यादव पवार, सखुबाई पवार, मथुराबाई पवार, सुंदराबाई पवार, राधाबाई पवार, तुळसाबाई पवार, यशोदा पवार आदी मान्यवर व ग्रामस्थ, महीला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ईश्वर हा एकच मात्र रूपे अनेक – ह.भ.प महंत श्रीराम महाराज विडेकर
### विडा येथे महाशिवरात्र उत्सव संपन्न



**केज । प्रतिनिधी**

एको देव : सर्वभूतेषु गुढ : सर्व व्यापी सर्वभूतान्तरामा या उपनिषदातील श्लोका नुसार ईश्वर हा एकच असून त्याची रूपे अनेक आहेत तसेच सर्व प्राणीमात्रामध्ये गुढ रूपाने वास्तव्य करत असल्याचे प्रतिपादन ह.भ.प महंत श्रीराम महाराज विडेकर यांनी केले. विडा येथे महाशिवरात्री निमीत्ताने आयोजित किर्तन सेवेत ते बोलत होते. सर्व संत हे विठ्ठल उपासक आहेत आणि या वारकरी संप्रदायाचे एक तत्व असून ते म्हणजे अनेकात्वांमध्ये एकत्व पाहणारा संप्रदाय आहे असे सांगितले या पर्व दिनानिमित्त त्यांनी कीर्तन सेवा करिता

स्वर्ग जयाची साळोंखा । समुद्र पाळी पिंड देखा ।।
शेषासरखि बैसका । जो आधार ही लोकीं ।

या संत ज्ञानेश्वरांच्या ईश्वर रूपाचे वर्णन पर अभंग वर निरूपण करताना त्यांनी ज्याची साळोंखा स्वर्गाला भिडली आहे व खालच्या पिंडीने समुद्राचा ठाव घेतला आहे जो शेषा सारखे बैठक करून बसला आहे तसेच ब्रह्मानंदी मन अर्पण करून ज्योतिर्लिंग हृदयात धारण केले असे भगवान शंकराच्या रूपाचे वर्णन केले आहे याप्रसंगी ह.भ.प सखारामजी कदम महाराज,महिपती बुवा ह.भ.प आंधळे बंधू,बाळा निर्मळ,तुकारामजी पटाईत, बबनदादा पवार,बाबा वाघ या भजनी मंडळी सह ह.भ.प केशवबापु देशमुख, पांडुरंग पवार,बाबासाहेब भाऊ,बळीराम देसाई,नवनाथ काका,भालेकर फौजी, नारायण देवा,जगन्नाथ गुरुजी यांच्यासह बहुसंख्येने महिला व पुरुष भक्त मंडळी उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब सावंत यांच्या परिवाराने केले होते.

## गावातच अडचणींचा निपटारा, शेतकऱ्यांना दिलासा

### माळापुरीत तहसीलदार शेळके यांची जनजागृती बैठक

**बीड । प्रतिनिधी**

कुर्ला मंडळातील माळापुरी येथे आयोजित करण्यात आलेली महसूल मंडळस्तरीय आढावा बैठक केवळ औपचारिकता न राहता, थेट नागरिकांच्या प्रश्नांना हात घालणारी आणि शासन आपल्या दारी या संकल्पनेला प्रत्यक्ष आकार देणारी लोकाभिमुख संवादसभा ठरली. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत प्रशासन आणि नागरिक यांच्यातील अंतर लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे चित्र दिसून आले . शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी ऐकून जागेवर मार्गदर्शन करण्यात आल्याने गावकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभाग अधिक गतिमान , पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत . छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या नियमित आढावा बैठका, तपासणी दौरे आणि स्पष्ट सूचनांमुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेला नवी दिशा मिळाल्याचे या बैठकीत जाणवले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपविभागीय अधिकारी कविता जाधव तसेच निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली



जिल्हा प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबवले जात असल्याचे अधोरेखित करण्यात आले . प्रशासन केवळ नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा न राहता समाजाच्या संवेदनशील प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेणारी व्यवस्था बनावी. या दृष्टीने निर्णय घेतले जात असल्याचे स्पष्ट झाले. बैठकीत अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीबाबत अनुदान, ई-पीक नोंदणी , ई-पीक पाहणी, नुकसान भरपाईसाठी आवश्यक कागदपत्रे, आधार कार्ड अद्ययावत ठेवण्याची आवश्यकता तसेच थेट लाभ योजनांचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले . सेवा मित्र अंतर्गत विविध प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले. यावेळी कृष्णा युवराज शिंदे यांचे ई डब्लू एस प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आणि सुधाकर रावसाहेब डोंगरे यांच्या शेतात ई पीक पाहणी अँप मधून पीक पाहणी करण्यात आली. तहसीलदार शेळके यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी शांतपणे ऐकून घेत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले . वेळेवर केलेले काम म्हणजे अर्धे यश या म्हणीप्रमाणे तातडीने प्रश्न सोडवण्यावर भर देण्यात आला . यावेळी सामाजिक विषयांवरही बैठकीत विशेष भर देण्यात आला. बालविवाह रोखण्यासाठी गावपातळीवर जनजागृती, शाळा– महाविद्यालयांत समुपदेशन, ग्रामपंचायत आणि पोलीस यंत्रणेच्या समन्वयातून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे एकूणच माळापुरी येथील ही महसूल मंडळस्तरीय आढावा बैठक राज्य शासनाच्या धोरणात्मक दिशेचा, विभागीय व जिल्हास्तरीय मार्गदर्शनाचा आणि तालुका स्तरावरील संवेदनशील अंमलबजावणीचा सुंदर संगम ठरली. प्रशासनाची तत्परता, निर्णयक्षमता आणि नागरिकांचा वाढता विश्वास यामुळे ही बैठक लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श नमुना ठरल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## आष्टीत महाशिवरात्री निमित्त तीन दिवसीय महोत्सव उत्साहात

### आ. सुरेश धस यांनी भक्तांच्या रांगेत उभं राहून घेतले पिंपळेश्वरांचे दर्शन

**आष्टी । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र पिंपळेश्वर महादेव देवस्थान मंदिरात महाशिवरात्री उत्सवानिमित्त तीन दिवसीय महोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. या महोत्सवाचे आयोजन श्री पिंपळेश्वर महादेव देवस्थान ट्रस्ट, श्री पिंपळेश्वर देवस्थान समिती आष्टी तसेच समस्त ग्रामस्थ आष्टी मुर्शदपुर यांच्या वतीने करण्यात आले होते. उत्सव काळात दररोज अभिषेक, महाआरती व दैनंदिन महाआरतीचे आयोजन करण्यात आले. तसेच कीर्तन केसरी ह भ प ज्ञानेश्वर महाराज कोठुळे भिवंडीकर



यांचे प्रभावी कीर्तन पार पडले. त्यांच्या कीर्तनातून उपस्थित भाविकांना अध्यात्मिक मार्गदर्शन लाभले. उत्सवाची सांगता भव्य शोभायात्रेने झाली. या शोभायात्रेत सुमारे अडीचशे वारकरी मुला-मुलींच्या टाळ-मृदंग भजनी मंडळ पथकाने सहभाग घेतला होता. 'हर हर महादेव'च्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. मराठवाडा भूषण लोकनेते सुरेश धस यांनी मंदिरात उपस्थित राहून पिंपळेश्वरांचे दर्शन घेतले व भाविकांशी संवाद साधला. आष्टी मुर्शदपूर परिसरासह तालुक्यातील लाखो भाविकांनी यावेळी दर्शनाचा लाभ घेतला. तीन दिवसीय महाशिवरात्री महोत्सवामुळे आष्टी शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

## माजलगावमध्ये जातीय शिवीगाळ व जीवघेणा हल्ला; पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

फिर्यादी शुभम रुपचंद कांबळे (वय २४, रा. जयभीमनगर, माजलगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते साबळे हॉस्पिटल येथे कंपाउंडर म्हणून कार्यरत आहेत. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ८.३० वाजता ड्युटी संपवून स्कुटी (MH 23 BK 5193) वरून घरी जात असताना चव्हाण हॉस्पिटलसमोर आरोपी रवि मारोती कुन्हाडे (रा. वडारवाडा) याने पल्सर मोटारसायकलवरून स्कुटीला कट मारला. स्कुटीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असल्याचे पाहून आरोपीने जातिवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. त्यानंतर आरोपीने मुद्दाम स्कुटीला धडक देऊन त्यांना खाली पाडले. यावेळी विशाल नागोराव चव्हाण, विलास नागोराव चव्हाण, राहुल नागोराव चव्हाण व लक्ष्मण भगवान शिंदे हे घटनास्थळी येऊन सर्वांनी मिळून मारहाण केली, असे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केला तसेच पोट व छातीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. कसाबसा सुटका करून ते माजलगाव शहर पोलीस ठाण्याकडे गेले. त्यानंतर त्यांच्या वडिलांनाही आरोपींनी मारहाण करून जातिवाचक शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. ही घटना १५ फेब्रुवारी रोजी रात्री ८.३० वाजता घडली असून १६ फेब्रुवारी रोजी पहाटे १२.३६ वाजता तोंडी फिर्याद नोंदविण्यात आली. पुढील तपास माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत.

## गोसेवा आणि समाजकार्याच्या माध्यमातून शेवटच्या माणसापर्यंत पोहोचा

### राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांचे भाजप कार्यकर्त्यांना आवाहन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष तथा राज्यमंत्री दर्जा लाभलेले शेखर मुंदडा यांनी अंबाजोगाई येथे भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना समाजकारण आणि राजकारणाची योग्य सांगड घालण्याचे आवाहन केले. आमदार नमिता मुंदडा यांच्या निवासस्थानी आयोजित या सदिच्छा भेटीदरम्यान त्यांनी आपल्या आतापर्यंतच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासाचा आढावा कार्यकर्त्यांसमोर मांडला. अध्यात्म, सेवा आणि राजकारण या तिन्ही क्षेत्रांत काम करताना लोकहित कसे जोपासावे, याचे जिवंत उदाहरण त्यांनी आपल्या



भाषणातून दिले. मुंदडा यांनी आपल्या मार्गदर्शनात प्रामुख्याने गोवंश रक्षा आणि शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणावर भर दिला. कत्तलखान्याकडे जाणाऱ्या गायी वाचवण्यासाठी त्यांनी थेट शेतकऱ्यांशी संवाद साधून गेल्या चार वर्षांत साडेपाच कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केले आहेत. या माध्यमातून ५२०० हून अधिक गोवंशाचे प्राण वाचवण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले. केवळ भाकड झाली म्हणून गाय विकणाऱ्या शेतकऱ्याला थेट आर्थिक बळ देऊन तो गोवंश गोशाळेत सुरक्षित कसा राहील, यावर आयोगाचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच गोशाळांना स्वावलंबी करण्यासाठी गोमूत्र आणि शेणापासून विविध उत्पादने तयार करून त्यांचे ब्रँडिंग करण्याचे नियोजन राज्य सरकार करत असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी शेखर मुंदडा यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखालील कामाचे कौतुक केले. पंकजा मुंडे यांनी घेतलेल्या पुढाकारामुळेच गोसेवा आयोगासाठी ऐतिहासिक १२२ कोटी रुपयांची तरतूद झाल्याचे त्यांनी नमूद केले. गोशाळांना मिळणारे अनुदान आणि पर्यावरणपूरक अंत्यविधीसाठी लाकडांऐजी शेणापासून बनवलेल्या 'गो-काष्ठ'चा वापर यांसारख्या नाविन्यपूर्ण संकल्पनांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## बीडमध्ये अंबिका चौक, राजीव गांधी चौकातील सर्व अडथळे तत्काळ हटवा

● भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या बीड नगरपरिषद प्रशासनाला सूचना
● वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी दोन्ही चौकात यंत्रणेसोबत पाहणी



**वाहतूक पोलिसांच्या नेमणुकीसाठी पोलीस अधीक्षकांना भेटणार**

**अंबिका चौक, राजीव गांधी चौक या वर्दळीच्या ठिकाणी सकाळी व संध्याकाळी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने या ठिकाणी कायमस्वरूपी वाहतूक पोलिसांची नेमणूक करण्याबाबत पोलीस अधीक्षकांना भेटून चर्चा करणार असल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.**

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील अत्यंत वर्दळीचे अंबिका चौक आणि राजीव गांधी चौक येथील वाहतूक कोंडी कमी करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी निर्माण झालेले सर्व प्रकारचे अडथळे तात्काळ हटविण्याच्या सूचना भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीड नगरपरिषद प्रशासनाला दिल्या. यासंदर्भात त्यांनी मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि संबंधित यंत्रणेसोबत सोमवारी (दि.१६) दोन्ही चौकांची प्रत्यक्ष पाहणी केली. अंबिका चौकातील सुशोभीकरणामुळे वारंवार निर्माण होणारा वाहतुकीचा अडथळा दूर करण्याबरोबरच परिसरातील अतिक्रमणे हटविण्याची गरज आहे. तसेच, राजीव गांधी चौकातील मध्य रस्त्यात उभा असलेला विजेचा खांब तातडीने हलविण्याची मागणीही करण्यात आली. अंबिका चौकातील रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) अन्यत्र हलविण्याबाबत महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशीही चर्चा करण्यात आली. ही कामे लवकरात लवकर मार्गी लागण्यासाठी महावितरण कंपनीकडे सातत्याने पाठपुरावा करावा, अशा सूचना डॉ.क्षीरसागर यांनी दिल्या.

## बीडच्या सहयोग नगरमध्ये टोळक्याचा थरार; पिता-पुत्रावर भररस्त्यात जीवघेणा हल्ला

**● याआधीही घरात घुसून महिलांना मारहाण; पोलिसांवर दुर्लक्षाचा आरोप**

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील सहयोग नगर परिसर आज सकाळी पुन्हा एकदा दहशतीच्या छायेत गेला. सदाशिव कोकाट आणि त्यांचा मुलगा हे नेहमीप्रमाणे आपल्या दुकानाकडे जात असताना, त्यांच्या एमआयडीसी भागातील घरासमोर दबा धरून बसलेल्या टोळक्याने भररस्त्यात त्यांच्यावर काठ्या-लाठ्यांनी व शस्त्रांनी हल्ला चढवला. या बेदम मारहाणीत पिता-पुत्र गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, हल्लेखोरांनी अचानक रस्ता अडवून शिवीगाळ करत मारहाण सुरू केली. काही



क्षणातच परिसरात गोंधळ उडाला. नागरिकांनी धाव घेईपर्यंत हल्लेखोरांनी दोघांना गंभीर जखमी करून पसार झाल्याचे सांगितले जाते. या घटनेपूर्वी अवघ्या पाच दिवसांपूर्वी याच टोळक्याने कोकाट कुटुंबाच्या घरात घुसून महिलांना मारहाण केल्याचा आरोप आहे. या टोळक्यात काही महिलांचाही समावेश असल्याचे सांगितले जाते. त्या वेळी छेडछाडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र आम्ही मारहाणीची तक्रार का दिली? या कारणावरून सूडबुद्धीने आजचा हल्ला झाल्याचा आरोप कोकाट कुटुंबीयांनी केला आहे. कोकाट कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, समोरच्या घरात बेकायदेशीर व्यवसाय सुरू असून त्यांच्या घरावर सुरक्षेसाठी बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे समोरील लोकांना अडथळा निर्माण होत आहे. गेल्या तीन वर्षांपासून आम्हाला सातत्याने त्रास दिला जात आहे. अनेक वेळा पोलिसांत तक्रारी दिल्या, पण ठोस कारवाई झाली नाही, असा गंभीर आरोप सदाशिव कोकाट यांनी केला आहे. तक्रार दिल्यानंतरही आमचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही. उलट आम्हालाच गप्प बसण्यास सांगितले जाते, असा थेट आरोप कोकाट कुटुंबाने पोलिस प्रशासनावर केला आहे. त्यामुळे या प्रकरणात पोलिसांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. घटनेनंतर सहयोग नगर परिसरात तणावाचे वातावरण असून नागरिकांनी तात्काळ कडक कारवाईची मागणी केली आहे. वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संबंधित टोळक्यावर कठोर गुन्हे दाखल करून त्यांना त्वरित अटक करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. मात्र, वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे सहयोग नगरमधील नागरिकांमध्ये भीतीचे सावट कायम आहे.